मुंबई शहर सीसीटीव्ही प्रकल्पासाठी प्रकल्प अंमलबजावणी समिती (PIC) गठित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीसीटी-०८१५/प्र.क्र.२७/भाग-७/पोल-३

गृह विभाग, २ रा मजला,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: १३ मे, २०१९

वाचा -

१) गृह विभाग, शासन निर्णय क्र. आयएसएस १००९/प्र.क्र.३१३/विशा-४, दि.२७.०७.२०११.
२) गृह विभाग, शासन निर्णय क्र.आयएसएस-१००९/प्र.क्र.३१३ (भाग-२)/विशा-४, दि.६.१.२०१२.
३) महाराष्ट्र शासन आणि मे. लार्सन अँड टुब्रो कंपनी यांचे दरम्यान दि.७.२.२०१५ रोजी झालेला करार.
४) शासनाचे क्र.सीसीटी ३११५/प्र.क्र.२१/पोल-३,दि.७.२.२०१५ चे कार्यादेश.
५) मुंबई शहर सीसीटीव्ही प्रकल्प कार्यान्वित (Go Live) झाल्याचे घोषित केल्याचे पत्र दिनांक ०८.११.२०१७.
६) उच्च शक्ती प्रदान समितीचे दि.०८.०४.२०१९ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रस्तावना-

मुंबई सीसीटीव्ही प्रकल्प दि.०५.०९.२०१७ पासुन कार्यान्वित झालेला आहे.याअनुषंगाने उच्चशक्ती प्रदान समितीच्या दि.०८.०४.२०१९ रोजीच्या बैठकीत पोलीस आयुक्त,मुंबई यांचे अध्यक्षतेखाली प्रकल्प अमंलबजावणी समिती गठीत करण्याबाबत निर्णय घेण्यात आला होता,त्याअनुषंगाने उचीत आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

शासन निर्णय:-

मे. लार्सन अँड टुब्रो कंपनी लि. व शासन यांच्यामध्ये दि.०७.०२.२०१५ रोजी मुंबई शहर सीसीटीव्ही प्रकल्पासंदर्भात करार झालेला आहे. दि.१०.०५.२०१६ रोजीच्या उच्च स्तरीय समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयाच्या आधारे सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या संख्येनुसार प्रकल्पाचे तीन टप्पे निश्चित करण्यात आलेले आहेत. मे. लार्सन अँड टुब्रो लि. या कंपनीने मुंबई सीसीटीव्ही प्रकल्पाच्या तिस-या टप्प्याचे काम पूर्ण केले असून त्यानुसार मुंबई शहर सीसीटीव्ही प्रकल्प दि.०५.०९.२०१७ रोजी कार्यान्वित (Go-Live) झाला असे घोषीत करण्यात आले आहे.

२ मुंबई सीसीटीव्ही प्रकल्प व्यवस्थित पूर्ण कार्यक्षमतेने चालू आहे किंवा कसे, काय अडचणी येत आहेत यादृष्टीने मुंबई सीसीटीव्ही संनिरिक्षण प्रकल्पाचा वेळोवेळी आढावा घेण्याकरिता खालीलप्रमाणे प्रकल्प अंमलबजावणी समिती (PIC) गठीत करण्यात येत आहे.

अक्र.	अधिकाऱ्यांचे पदनाम	समितीवरील पद
१.	पोलीस आयुक्त,मुंबई	अध्यक्ष
२.	अतिरिक्त आयुक्त,मुंबई महानगरपालिका	सदस्य
३.	सह पोलीस आयुक्त,का.व सु.	सदस्य
४.	सह पोलीस आयुक्त,वाहतुक	सदस्य
५.	पोलीस उपायुक्त,अभियान	सदस्य

उपरोक्त समितीमार्फत प्रकल्पाचा वेळोवेळी आढावा घेण्यात यावा तसेच आवश्यक त्या शिफारशी उच्च स्तरीय शक्ती प्रदान समितीकडे कराव्यात, उपरोक्त समितीस काही इतर अधिकाऱ्यांना “निमंत्रित सदस्य” म्हणूनही निमंत्रित करता येईल.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०५१३१७३९४३८८२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dinesh Appaji Saste

Digitally signed by Dinesh Appaji Saste
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a49495d0d4b31e36ff1d612a85453ca984b74e28fd6f99cdf66e3e499969e942, cn=Dinesh Appaji Saste
Date: 2019.05.13 17:43:15 +05'30'

(दिनेश सस्ते)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. मा.राज्यमंत्री, गृह (शहरे) यांचे खाजगी सचिव.
४. मा.मुख्य सचिव यांचे उपसचिव.
५. अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.

६. प्रधान सचिव (विशेष) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक.
७. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
८. पोलीस आयुक्त, मुंबई.
९. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१०. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
११. मे. लार्सन अँड टुब्रो कं. लि, एल अँड टी हाऊस, एन. एम. मार्ग, बलार्ड इस्टेट, मुंबई-१.
१२. मे.प्राईसवॉटर हाऊस कुपर्स लि., २५२, वीर सावरकर मार्ग, दादर (प), मुंबई-४०० ०२८.
१३. वित्त विभाग, व्यय-७/वित्तीय सुधारणा.
१४. अर्थसं-१/गृह विभाग, मुंबई.
१५. रोख शाखा/ गृह विभाग, मुंबई.
१६. निवडनस्ती, पोल-३.